अन्याय अत्याचाराविरोधात आवाज बुलंद करणारे एकमेव वृत्तपत्र
Email: vedhtajya@gmail.com / Website: Wedhtajyaghadamodincha.com

# वेध ताज्या घडामोडींचा

संपादक - सुनिता भगवान केसभट
मो.९९८७५८१३४८

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे, अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद, सातारा येथून एकाचवेळी प्रकाशित होणारे वृत्तपत्र

वर्ष : ९वें | अंक :८ | गुरुवार, ७ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर २०२३ | RNI No. MAHMAR/2015/64681 | पृष्ठ : ४ | मूल्य : २ रुपये

## यंदा ७५ हजार गोविंदांना मिळणार विम्याचे कवच

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

**वेध ताज्या घडामोडी/प्रतिनिधी**

मुंबई - आगामी दहीहंडी, गणेशोत्सव उत्साहाने, शांततेने जल्लोषात साजरे करतानाच कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. राज्यातील सर्व आगमन आणि विसर्जन मार्गांची डागडुजी करण्यासाठी जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्तांनी तातडीने कार्यवाही करावी. समाज प्रबोधनाचा संदेश देतानाच पर्यावरणपूरक सण साजरे करण्यासाठी मंडळांनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी केले.



सह्याद्री अतिथीगृह येथे दहीहंडी व सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त आढावा बैठक मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव मनोज सौनिक, पोलिस महासंचालक रजनीश सेठ, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसळकर, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांच्यासह मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समिती, दहीहंडी असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते. सर्व जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, जिल्हा पोलिस प्रमुख दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. मुंबईमधील सर्व रस्ते, गल्ली बोळांमध्ये स्वच्छता ठेवण्याची मुंबई महापालिका आयुक्तांना यावेळी सूचना देण्यात आल्या. यावेळी पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, ठाणे येथील अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

## न्यू केअर प्लस रुग्णालयाचे प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते उद्घाटन



पनवेल - नवीन पनवेल येथे राजेश जंगम, शार्दूल चव्हाण, सौरभ जंगम आणि संकेत जंगम यांनी सुरू केलेल्या न्यू केअर प्लस रुग्णालयाचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते करून त्यांनी शुभेच्छा दिल्या. या उद्घाटन सोहळ्याला माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह शेकाप पनवेल मनपा जिल्हा चिटणीस गणेश कडू, माजी. नगराध्यक्ष संदीप पाटील, पनवेल कृ बा समिती संचालक देवेंद्र मढवी माजी नगरसेवक प्रवीण पाटील, उद्योजक राकेश श्रीवास्तव तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

## मनोज जरांगे यांची प्रकृती खालावली

### उपोषण मंडपातच सलाईनवर



जालना - मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी प्राणपणाला लावले आहेत. जरांगे पाटील गेल्या नऊ दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. आज नवव्या दिवशी त्यांची प्रकृती खालावली आहे. मात्र, तरीही ते आपल्या निर्धारावर ठाम आहेत. कोणत्याही परिस्थितीत उपोषण सोडायचे नाही असा निर्धारच त्यांनी केला आहे. तर त्यांची प्रकृती खालावल्याने मराठा कार्यकर्त्यांना टेन्शन आले आहे. सरकारने जरांगे पाटील यांना वाचवावे. आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा काढावा, असे कळकळीचे आवाहन मराठा आंदोलकांनी केले आहे. मनोज जरांगे पाटील हे अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या उपोषणाचा आज नववा दिवस आहे. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावली आहे. अंगात ताकद राहिली नाही. त्यांना अस्वस्थ वाटू लागले आहे. त्यामुळे उपोषण स्थळीच जरांगे पाटील यांना सलाईन लावण्यात आली आहे. पहाटेच त्यांना सलाईन लावली आहे. त्यांच्याभोवती कार्यकर्ते जमले आहेत. तर जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याची वार्ता पसरल्याने जालना, औरंगाबादसह आजपासच्या जिल्ह्यातून मराठा कार्यकर्ते अंतरवाली सराटीकडे यायला निघाले आहेत. त्यामुळे आज अंतरवाली सराटी येथे आंदोलकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक संजय सक्सेना आणि जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी अचानक उपोषण स्थळाला भेट दिली. यावेळी त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. आंदोलकांनाही शांतता राखण्याचे आवाहन केले. दरम्यान, अतिरिक्त पोलीस महासंचाल आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अचानक आल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या होत्या.




## शिवसेना भवनासमोर निष्ठावंतांची दहीहंडी

मुंबई - शिवसेना भवनासमोर निष्ठावंतांची दहीहंडी होत आहे. मनसेची भगवती शाळेच्या मैदानात आणि आमदार प्रताप सरनाईक यांची वर्तकनगर झेडपी मैदानात दहीहंडीचा थरार रंगणार आहे. सरनाईकांच्या संस्कृती प्रतिष्ठानवतीने 'प्रो-गोविंदा'च्या संकल्पनेतून ही दहीहंडी आयोजित केली आहे. भाजपचे शिवाजी पाटील यांच्या स्वामी प्रतिष्ठानची डॉ. घाणेकर नाट्यगृह चौकात तर कृष्णा पाटील यांची गोकुळ दहीहंडी कॅसलमील चौकात असणार आहे.



# ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा मार्ग झाला मोकळा; राज्यभरातील विद्यार्थ्यांना दिलासा

## खासदार श्रीरंग बारणे यांचा यशस्वी पाठपुरावा

**वेध ताज्या घडामोडी/प्रतिनिधी**

पिंपरी - पनवेलमधील पिल्लेज महाविद्यालयातील ६० ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य शासनाने नवीन विषयांचा समावेश करत सुधारित आदेश काढले आहेत. यासाठी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी यशस्वी पाठपुरावा केला. त्यांच्या सततच्या पाठपुराव्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार ओबीसी विभागाने हा आदेश काढला. याचा राज्यभरातील विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे.



ओबीसी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क किंवा शिष्यवृत्तीचा लाभ मिळू शकणाऱ्या ६४ अभ्यासक्रमांची यादी शासन निर्णयाने जाहीर करण्यात आली होती. परंतु त्या शासन निर्णयामध्ये 'इलेक्ट्रॉनिक अँड कम्प्युटर इंजीनियरिंग' हेच नाव दोनदा आले. 'इलेक्ट्रॉनिक अँड कम्प्युटर सायन्स' या विषयाकरता मिळणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी शासकीय अध्यादेशात नाव चुकीचे किंवा छापलेच नसल्याने विद्यार्थ्यांना मिळाली नव्हती. पनवेल मधील पिल्लेज महाविद्यालयात ही शिष्यवृत्ती मिळणार या आशेने दोन वर्षांपूर्वी प्रवेश घेतलेले तब्बल ६० विद्यार्थी या शिष्यवृत्ती पासून वंचित राहिले होते. महाविद्यालयाने शासनाशी पत्रव्यवहार करूनही काही प्रतिसाद मिळत नसल्याने अखेरीस कॉलेजने विद्यार्थ्यांकडे लाखो रुपये फी ची मागणी करण्यास सुरुवात केली. विद्यार्थी व पालकांनी महानगरप्रमुख माजी नगरसेवक अ‍ॅड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांना हा विषय सांगितला. सोमण यांनी पुढाकार घेऊन मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांना या विषयाबद्दल माहिती दिली. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन खासदार बारणे यांनी त्वरित विषयाचा पाठपुरावा सुरू केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अंतिम आदेशाने अखेरीस आता हा शासन निर्णय दुरुस्त करून पुन्हा प्रसिद्ध करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा मार्ग मोकळा झाला. विद्यार्थी व पालक यांना प्रचंड मोठा दिलासा मिळाला. पालकांनी शासनाचे आभार मानण्यासाठी वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री शिंदे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. सुधारित शासन निर्णय आल्यानंतर आता पनवेलच नव्हे तर राज्यभरातील ओबीसींना या विशिष्ट विषयाकरता मिळणाऱ्या शिष्यवृत्तीचा मार्ग मोकळा झाला असल्याचे खासदार बारणे म्हणाले.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून वैद्यकीय शिक्षणासाठी डॉ. भावेश जोशींना दोन लाख रुपयांची मदत



पनवेल - परदेशातील वैद्यकीय शिक्षणासाठी नवीन पनवेल येथील डॉ. भावेश कृष्णा जोशी यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून दोन लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. सदरचा धनादेश श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे संस्थापक लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते डॉ. भावेश यांना प्रदान करण्यात आला. यावेळी कामोठे भाजप मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक बबन मुकादम आदी उपस्थित होते.

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या २५ पेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या आणि आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतःच्या पायावर उभे केले जाते. डॉ. भावेश जोशी जर्मनी देशात 'मास्टर्स इन सर्जरी-जनरल सर्जरी विथ रोबोटिक' या कोर्सचे शिक्षण घेणार आहेत. त्यांनी आर्थिक मदतीकरिता विनंती अर्ज केला होता, त्या अनुषंगाने त्यांना दोन लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.

# शेवगाव तालुक्यातील काशी केदारेश्वर देवस्थानवर दर्शनासाठी भाविकांच्या रांगा

## प्रभू रामचंद्र सीतामाई व लक्ष्मणाचा वनवास काळ या काशी केदारेश्वर दंडकारण्यामध्ये घडल्याने या देवस्थानला महत्त्व

**पांडुरंग निबांळकर**

शेवगाव - अहमदनगर जिल्ह्याच्या शेवगाव तालुक्यातील श्री काशी केदारेश्वर देवस्थान अत्यंत पुरातन व ऐतिहासिक असे असून महर्षी वाल्मिक ऋषींचे वास्तव्य या दंडकारण्यात होते. श्रीराम प्रभू सीतामाई व लक्ष्मण यांचा वनवास काळ याच भागात घडला. त्यावेळी या ठिकाणी असणारे त्यांचे काही संसार उपयोगी दगडी पाशाणाच्या वस्तु, पंधरा ते वीस फूट उंचीचे पाण्याचे रांजण, मोठमोठ्या पद्धतीचे दगडी पाषाणी जाते, सीतामाईची अंघोळ करण्याची न्हाणी, अशा पुरातन खुणादेखील अजूनही येथे अजरामर आहेत. या काशी केदारेश्वर पुरातन मंदिराचे सुशोभीकरण झाल्याने



मंदिर भाविकांचे लक्ष वेधून घेत असल्याने महाराष्ट्रातून भाविक श्रावणातल्या तिसऱ्या सोमवारी व महाशिवरात्रीला शिवजीच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने हजेरी लावत असतात. या देवस्थान व मठाचे चौदावे संन्याशी परंपरा असलेले मठाधिपती बाबागिरी महाराज यांनी आमचे अहमदनगर शेवगावचे प्रतिनिधी पांडुरंग निंबाळकर यांना या देवस्थान विषयी मोलाची माहिती दिली असून बोधेगाव पोलीस दुरुक्षेत्राचे पोलीस उप उपनिरीक्षक भास्कर गावंडे, पोलीस नाईक राजेंद्र ससाने, पोलीस नाईक सुखदेव धोत्रे, पोलीस कॉन्स्टेबल संदीप म्हस्के, आदींनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस महासंचालक (वाहतुक) यांच्याकडून नवी मुंबई येथे आढावा बैठक



**वेध ताज्या घडामोडी/प्रतिनिधी**

नवी मुंबई - राज्यातील आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ अंतर्गत मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला.

गणेशोत्सव काळात वाहतुक कोंडी होऊ नये यासाठी डेल्टा फोर्स व पेट्रोलिंग वाहनांची गस्त वाढविण्यात आली असून आवश्यक त्याठिकाणी सुचना फलक, रंबलर स्ट्रीप, गतीरोधक फलक, वाहतुक नियंत्रण सुचना फलक आदी लावण्यात आले असल्याचे नवी मुंबई येथील आढावा बैठकीत सांगण्यात आले. दरम्यान, गणेशोत्सव काळात कोकणातील गणेश भक्तांना त्यांच्या गावी वेळेत पोहचता यावे व गणेशोत्सवा दरम्यान वाहतुक कोंडी न होता हा सण निर्विघ्नपणे पार पाडावा यासाठी अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) डॉ. रविंद्र सिंगल यांच्या अध्यक्षतेखाली नवी मुंबई येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रीय महामार्गांवर झालेल्या विविध अपघातात मदत करणाऱ्यांचा अपर पोलीस महासंचालक(वाहतुक) डॉ. रविंद्र सिंगल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# पार्किंग नियोजनासाठी नवी मुंबई पालिकेची ठोस पावले

**वेध ताज्या घडामोडी/प्रतिनिधी**

नवी मुंबई - नवी मुंबई शहराला भेडसावणाऱ्या पार्किंग समस्येची सोडवणूक करण्याकडे नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने विशेष लक्ष दिले जात असून या विषयी वाहतूक पोलीस विभागाच्या सहकार्याने विभागवार मायक्रोप्लॅनिंग केले जात आहे. यामध्ये वाहतूक नियोजना सोबतच सिडकोकडून पार्किंग प्लॉट उपलब्ध करुन घेणे. तसेच मिळालेले प्लॉट पार्किंगच्या दृष्टीने विकसीत करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यामध्ये सेक्टर १५ ए सीबीडी येथे पार्किंग करीता बहुमजली इमारत बांधली असून येथील क्षमता १२१ दुचाकी व ३९६ चार चाकी गाड्या इतकी आहे. हा संपूर्ण परिसर विविध कार्यालये आणि वाणिज्य संस्था यांनी गजबजलेला असल्याने या पार्किंग इमारतीमुळे मोठ्या प्रमाणावर वाहने पार्किंगसाठी फायदा होणार आहे.



अशाच प्रकारे आणखी एक ६९०० चौ.मी.चा भूखंड सेक्टर १५, सीबीडी बेलापूर येथे तसेच ११ हजार चौ.मी. चा भूखंड सेक्टर ३० वाशी येथे उपलब्ध झाला असून या दोन्ही भूखंडावर पार्किंग व्यवस्था नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत पीपीपी तत्वावर (सार्वजनिक खाजगी भागिदारी) विकसीत करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. अशा कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च होत असतो. याद‍ृष्टीने या दोन्ही भूखंडावरील पार्किंग व्यवस्था पीपीपी तत्वावर विकसीत करण्याचे नियोजन करण्यात आलेले असून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गतीमान कार्यवाही केली जात आहे. याबाबत आयुक्तांमार्फत वारंवार आढावा बैठकांचे आयोजन केले जात असून या प्रक्रियेतील अडचणी दूर करण्यावर भर दिला जात आहे. या दोन्ही पार्किंग भूखंडावरील पार्किंग व्यवस्थेच्या नियोजनाबाबत आर्थिक व्यवहार सलागार यांची नेमणूक करण्यासाठी महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीला मान्यताप्राप्त संस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून याद्वारे नेमणूक होणाऱ्या सल्लागारांच्या रिपोर्टनुसार पीपीपी तत्वावर पार्किंगचे नियोजन करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पार्किंग व्यवस्था अद्ययावत असावी याकडे विशेष लक्ष दिले जात असून या पार्किंग व्यवस्थेचा लाभ जास्तीत जास्त लोकांना व्हावा याद‍ृष्टीने महानगरपालिकेच्या निधीचीही बचत व्हावी याकरिता पीपीपी तत्वाचा वापर करुन वाहनतळ विकसीत केले जात असून इतर शहरातील पर्यटक वाहन चालकांनाही कोणते पार्किंग लॉट उपलब्ध आहेत याची माहिती सहजपणे उपलब्ध होण्याकरिता स्वतंत्र अ‍ॅप विकसीत केले जात असल्याचे सांगत महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी आपले वाहन पार्किंगच्या योग्य जागीच उभे करावे असे आवाहन नागरिकांना केले आहे.

# शिक्षक दिनी गुणवंत विद्यार्थी घडवणाऱ्या नवी मुंबई महापालिका शाळांतील शिक्षकांचा सन्मान

नवी मुंबई - शिक्षक दिन हा देशाचे भविष्य घडविणाऱ्या शिक्षकांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने शिष्यवृत्तीसह इतर स्पर्धा परीक्षा, विज्ञान तंत्रज्ञान प्रकल्प स्पर्धा, शालांत बोर्ड परीक्षा यामध्ये गुणवंत विद्यार्थी घडविणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका शाळांतील शिक्षकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी ऐरोली विधानसभा सदस्य आमदार गणेश नाईक, बेलापूर विधानसभा सदस्य आमदार मंदाताई म्हात्रे, महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार म्हसाळ, सुप्रसिध्द साहित्यिक प्रा. प्रवीण दवणे, शिक्षण विभागाचे उपआयुक्त दत्तात्रय घनवट,



भांडार विभागाच्या उपआयुक्त मंगला माळवे, क्रीडा विभागाच्या उपआयुक्त ललिता बाबर, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, शिक्षणाधिकारी अरुणा यादव व इतर मान्यवर उपस्थित होते. नवी मुंबई हे समृध्द विचारांचे शहर असून दरवर्षी पटसंख्या वाढणारे महानगरपालिकेचे शिक्षण व्हिजन कौतुकास पात्र आहे व यामागे शिक्षकांचे फार मोठे योगदान असल्याचे मत व्यक्त करीत आमदार गणेश नाईक यांनी शिक्षण विभागाचा शाळानिहाय पॅटर्न तयार करण्याची सूचना केली.

याप्रसंगी बोलताना आमदार मंदाताई म्हात्रे यांनी त्यांच्या शालेय जीवनातील आठवणी सांगत शिक्षकांप्रती आदरभाव व्यक्त केला. कोणत्याही व्यक्तीच्या प्रगतीत त्याच्यावर संस्कार करणाऱ्या शिक्षकांचा मोठा वाटा असतो असेही त्यांनी सांगितले. दोन्ही आमदारांनी ठोक मानधनावरील शिक्षकांचे प्रश्न सोडविण्याच्या सूचना महापालिकेला केल्या. आयुक्त राजेश नार्वेकर यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील शिक्षण पद्धतीवर पालकांचा इतका विश्वास आहे की महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांची पटसंख्या दरवर्षी हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी वाढते याचा आनंद वाटतो असे सांगितले. यावर्षी सीबीएससी बोर्डाची तिसरी शाळा सुरु झाली. तेथील प्रवेशासाठी वेगवेगळ्या स्तरातून इतक्या मोठ्या प्रमाणात फोन आले की नवी मुंबई शाळांतील गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्व जाणवले असेही ते म्हणाले. कोव्हीड कालावधीमुळे मागील तीन वर्ष होऊ न शकलेला शिक्षक दिन समारंभ यावर्षी उत्साहात साजरा होत असल्याबद्दल आयुक्तांनी समाधान व्यक्त केले तसेच दोन्ही आमदारांनी उल्लेख केलेल्या ठोक मानधनावरील शिक्षकांच्या मानधन वाढीबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

# पाऊसा अभावी कपाशी, तुर-सोयाबीन पिके धोक्यात

## शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ आभाळाकडे लागले लक्ष

**पांडुरंग निबांळकर**

शेवगांव - अहमदनगर जिल्ह्याच्या शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील पाऊस नसल्याने कपाशी पिकाने माना टाकले आहेत. हाता तोंडाशी आलेला घास पाऊस हिरावून घेतो की काय या चिंतेने शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागलेले आहेत. बालमटाकळी, बोधेगाव, सुकळी, बाडगव्हाण, हादगाव, कांबी, शेकटे, मुरमी, जळगाव, आधोडी दिवटे आदी भागात मोठ्या प्रमाणात कपाशीचे तुर पीक घेण्यात येते. गेल्या पंधरा ते वीस वर्षापासून हा पेरा वाढत आहे. चालू खरीप हंगामात कर्ज काढून महागडे बियाणे घेऊन शेतकऱ्यांनी पेरणी केली आहे. रिमझिम पावसावर कपाशी उगवून आली. कपाशीला बाळसे येण्यासाठी शेतकऱ्यांनी बैल



पाळ्या आणि खत टाकून शेतकऱ्यांनी तो जोपासण्याचा प्रयत्न केला. कपाशी ताशी लागत असताना ढगाळ वातावरणामुळे किडीचा प्रादुर्भाव झाला परंतु शेतकऱ्यांनी हार न मानता फवारणी करून ती जगावण्याचा प्रयत्न केला मात्र पाऊस नसल्याने पिके माना टाकू लागल्याने शेतकऱ्यांचे चिंतेत वाढ झाली व आभाळाकडे लक्ष लागले आहे.

# गणेश मुर्त्यांच्या सजावटीसाठी बाजारपेठा विविध वस्तुंनी सजल्या

पनवेल - सध्या गणेशमूर्तीला अतिरिक्त सजावटीची मागणी वाढली आहे. विविध रंगांचे, पद्धतीचे फेटे, उपरणे, माळा, धोतर, हाताचे कडे अशा विविध आभुषणे मूर्तीवर सजावटीसाठी मागितली जात आहेत. अशा सजावट केलेल्या अनेक मूर्ती बाजारात पाहायला मिळत आहेत. दरवर्षीप्रमाणे गणेशोत्सवात गजबजणाऱ्या बाजारपेठा यंदाही गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या सजावटीच्या विविध वस्तूंनी सजल्या आहेत. मात्र, या सर्व वस्तूंच्या खरेदीबरोबरच गणेशभक्तांकडून गणेशमूर्तीच्या सजावटीसाठी लागणाऱ्या विविध साहित्यांची यंदा मोठी मागणी आहे. मागील काही वर्षात गणेशभक्तांच्या मागणीनुसार, मूर्तिकारांनीदेखील



वेगवेगळ्या स्वरूपात मूर्ती घडवण्यास सुरुवात केली आहे. सिंहासनावर, मूषकावर, गरुडावर आसनस्थ तसेच फेटा असलेल्या गणेशमूर्ती मूर्तिकार घडवत आहेत. मात्र, या मूर्तीनादेखील पुन्हा अतिरिक्त सजावटीची मागणी वाढली आहे. यामध्ये गणेशमूर्तीसाठी नवीन पितांबर, उपरणे, शाल, धोतर यांसारख्या कापडी वस्तूंची मागणी केली जात आहे.

यासाठी बोल्ड प्रिंट, एम्बॉस प्रिंट, फोईल प्रिंट अशा पद्धतीच्या गोष्टी वापरून गणपतीचे धोतर अधिक आकर्षक करण्याचा व्यापाऱ्यांकडून देखील प्रयत्न केला जात आहे. तसेच अनेक गणेशभक्तांकडून या सर्व गोष्टी सिल्कच्या कापडाच्या असाव्या, अशीही मागणी केली जात आहे.

# शेकडो कोटींच्या चिटफंड घोटाळ्याबाबत सखोल चौकशी व्हावी

**वेध ताज्या घडामोडी/प्रतिनिधी**

उरण - उरण येथील शेकडो कोटींच्या चिटफंड घोटाळ्या बाबत सखोल चौकशी व्हावी आणि आरोपी सतीश गावंड - सुप्रिया पाटील यांनी फसवून लुटलेल्या गरीब जनतेला त्यांचे पैसे मिळावे व न्याय मिळावा ह्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खा. श्रीकांत शिंदे यांचे निकटवर्तीय पदाधिकारी महाराष्ट्र सचिव रूपेश पाटील यांनी आवाज उठविला आहे.

गेले ७-८ महिने हे प्रकरण गाजत आहे, आरोपीना अटक झाली मात्र हजारो लोकांनी त्यावेळी सतीश गावंडला वाचविण्यासाठी पोलीस स्टेशन आणि कोर्टाबाहेर आंदोलने केली का तर या देवमाणूस आपल्याला सुटल्यावर पैसे परत देईल मात्र जामिनावर सुटून ही आणि ७-८ महिने वाट पाहूनही या आरोपींनी कोणालाही पैसे परत दिले नाहीत. यात अनेक एजंट काम करत होते, करोडो रुपये गोळा करुन या प्रक्रियेत टाकत होते मात्र सुटून आल्यावर ही कोणाचे पैसे मिळत नव्हते, ना कोणी याबाबत बोलत होतं ना कोणी आवाज उठवत होते मात्र युवासेनेचे रूपेश पाटील यांनी यावर आंदोलन सुरू केले, लोकांना आवाहन केले आणि आपली फसवणूक झालीय हे सरकारी दरबारी सांगू या, पोलीस प्रशासनाला मदत करुन या आरोपींना समाजासमोर आणूया यासाठी एका



जन संघर्ष समितीची स्थापना केली जिथे हे प्रकरण झाले त्याच गावात पहिली सभा लावली आणि हजारो लोकांनी जमा होऊन प्रतिसाद दिला, त्याच धर्तीवर चिरनेर, येथेही मोठी सभा घेण्यात आली, या फसवणुकीबाबत कोणत्या प्रकारे अर्ज भरावे कोणत्या प्रकारे माहिती द्यावी याबाबत प्रबोधन सुरु केले. आज हजारो लोकांनी फॉर्म भरले असून आपले पैसे मागण्यासाठी २ पाऊले पुढे आले आहेत. सदर प्रकार याबाबत मदत मिळावी पैसे परत मिळावे म्हणून खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्ग या प्रकरणात मुख्यमंत्री शिंदे यांची मदत घेतली जाणार आहे सभेची माहिती त्यांना देण्यात येते आणि एक स्पेशल इन्व्हेस्टिंग टीम ने या घोटाळ्याचा अभ्यास करावा तपास करावा ही मागणी या कमिटीच्या वतीने करण्यात येणार आहे.

# जुन्या इमारतींचा पुनर्विकास होणार

**वेध ताज्या घडामोडी/प्रतिनिधी**

मुंबई - राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने 'एक खिडकी' योजनेच्या मंजुरीसाठीचा 'शासन आदेश' जारी करण्यात आला. जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला चालना देऊन त्याबाबतच्या प्रस्तावावर तीन महिन्यांत प्रक्रिया होण्यासाठी 'एक खिडकी' योजना सुरू केली जाईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या परिषदेत केली होती. त्यानुसार एक खिडकी योजनेच्या मंजुरीसाठीचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे.

आदेशात म्हटले आहे, की एक खिडकी योजनेच्या माध्यमातून सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकास योजनेतील प्रस्ताव मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत त्यांच्या सर्व परवानग्या पूर्ण करणे बंधनकारक आहे. स्वयंपुनर्विकासाच्या अनुषंगाने सर्व संबंधित नियोजन प्राधिकरणांनी कार्यवाही करून दिलेल्या मुदतीत 'एक खिडकी' योजनेच्या माध्यमातून प्रस्ताव लवकरात लवकर निकाली काढावेत. त्याचबरोबर राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासासाठी सहकार क्षेत्रातील शिखर बँक असलेल्या राज्य सहकारी बँकेला नोडल एजन्सी जाहीर करण्यात आले आहे. ही एजन्सी त्या-त्या जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून काम पाहील. तसेच मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यासह मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राकरिता मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला नोडल एजन्सी म्हणून घोषित करण्यात आल्याचेही शासन आदेशात म्हटले आहे.

# शेकाप कामोठे यांच्या वतीने लाख मोलाची हंडी

## दोन लाखांहून अधिक अन्य परितोषकांसह धमाल मस्तीची रेलचेल

पनवेल - मा. आमदार बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी कामगार पक्ष कामोठे यांच्यावतीने भव्य दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कामोठ्यातील स्वर्गीय लोकनेते दि. बा. पाटील क्रीडांगण, सेक्टर २० येथे हा दहीहंडी सोहळा रंगणार आहे. मानाची दहीहंडी फोडणाऱ्या पथकाला तब्बल एक लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे.

साहसी खेळाच्या अनुषंगाने मानवी थर रचत दहीहंडी फोडण्याचा प्रकार दिवसेंदिवस व्यावसायिक स्वरूप धारण करत आहे. शेकडो पथके गोविंदा मास्तरांच्या मार्गदर्शनाखाली अनेक महिने सराव करत असतात. अशा पथकांच्या उत्साहवर्धनासाठी ठिकठिकाणी दहीहंडी सोहळ्याचे आयोजन होत असते. कामोठे विभाग शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने लाख मोलाची हंडी अशी थीम घेत भव्य दिव्य दहीहंडी स्पर्धेचे आयोजन केले आहे. पाच थर, सहा थर आणि सात थर लावणाऱ्या प्रत्येक दहीहंडी पथकास




पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. विशेष म्हणजे दहीहंडी सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी उपस्थित असणाऱ्या स्त्री व पुरुषांना आकर्षक लकी ड्रॉ द्वारे विविध पारितोषिके दिली जाणार आहेत. सुप्रसिद्ध उद्योगपती तथा शेकाप नेते जे एम म्हात्रे, पनवेल शहर चिटणीस गणेश चंद्रकांत कडू, शेकाप नेते काशिनाथ पाटील, माजी विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण शेठ घरत, माजी नगरसेवक शंकर शेठ म्हात्रे यांची या दहीहंडी सोहळ्या दरम्यान व्यासपीठावर विशेष उपस्थिती असणार आहे. अल्पेश माने, कुणाल भेंडे, गौरव पौरवाल यांच्या पुढाकाराने आयोजनाची सारी कामे नेटाने पूर्ण केली जात आहेत. गोविंदा पथकांच्या थरारा सोबतच मराठी हिंदी गाणी आणि लावणी नृत्याचा देखील उपस्थित प्रेक्षकांना लाभ मिळणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासंदर्भात अथवा अधिक माहितीसाठी ९८२१९०१७५८ या क्रमांकावर संपर्क करावा.

# खारकोपर ते उरण लोकल दिवाळीपर्यंत सुरु होणार!

नवी मुंबई - पाच महिन्यांपूर्वी नेरूळ ते उरण या बहुप्रतीक्षित मार्गावर चाचणीदरम्यान नेरूळ स्थानकातून निघालेली रेल्वे थेट उरण स्थानकात जाऊन थांबली. पहिल्यांदाच उरण शहरात रेल्वे पोहोचली. तेव्हापासून या मार्गावरील प्रवाशांचे लक्ष या रेल्वेसेवेकडे लागले आहे. आता खारकोपरपर्यंत थांबणारी रेल्वे प्रवाशांना घेऊन उरणला थांबणार, अशी भावना निर्माण झाली होती. मात्र, या मार्गावर रेल्वे चालवण्याचा यशस्वी प्रयोग केल्यानंतर पाच महिने उलटूनही प्रत्यक्षात उरणपर्यंत रेल्वे सेवा सुरू झालेली नाही, मात्र आता या मार्गावरील अडचणी, त्रुटी दूर करण्याच्या सूचना रेल्वे आयुक्तांकडून संबंधितांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार यावर कामे सुरू आहेत. ही कामे दिवाळीपूर्वी होणे शक्य नसल्याने उरणपर्यंत रेल्वेने प्रवास करण्यासाठी दिवाळीपर्यंत वाट पाहावी लागणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

यावर्षीच्या मार्च महिन्यात उरणपर्यंतच्या संपूर्ण रेल्वे मार्गाची उभारणी पूर्ण झाल्यावर खारकोपर ते उरण या मार्गावर रेल्वे चालवून या मार्गाची पडताळणी करण्यात आली. उरण स्थानकात रेल्वे पोहोचल्यावर आता रेल्वे सेवा सुरू होणार, अशी आशा सर्वांच्याच मनात निर्माण झाली होती. रेल्वेही हा मार्ग सुरू करण्यासाठी उत्सुक होती, मात्र रेल्वे आयुक्तांनी या कामात काही त्रुटी सांगितल्या.

# छत्रपती संभाजीनगर निवडणुकीसाठी मनसे उतरणार मैदानात



छत्रपती संभाजीनगर - महाराष्ट्र नवनिर्माण सेना येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे. २००९ नंतर पक्षाने निर्णय घेतला असून, त्यासाठी मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून प्राथमिक आढावा घेतला.

लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या सहा विधानसभानिहाय पक्षबांधणी, बूथनिहाय रचना, नव्याने कराव्या लागणाऱ्या बदलांबाबत नांदगावकर यांनी चर्चा केली. बैठकीला मनसे नेते दिलीप धोत्रे, उपाध्यक्ष पाटसकर, जिल्हाप्रमुख सुमीत खांबेकर, आदींची उपस्थिती होती. या पार्श्वभूमीवर घेतलेल्या पत्रकार परिषदेत नांदगावकर म्हणाले, अंतरावली येथील आंदोलकांची भेट घेतली. त्यांचे मनसेप्रमुख ठाकरे यांच्या बोलणे करून दिले. शासनाने आंदोलन चिरडण्याचा केलेला प्रयत्न योग्य नाही. शासन अनेक कायदे करीत आहे. त्यामुळे आरक्षण देणे ही बाब सरकारला अवघड नाही. लोकसभा निवडणुकीसाठी पक्षाकडून योग्य उमेदवार दिला जाईल, असेही ते म्हणाले.




# मराठा आरक्षणाचा निर्णय संसदेच्या विशेष अधिवेशनातच घ्या - नाना पटोले

मुंबई - मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न भारतीय जनता पक्षाच्या सरकारनेच चिघळवला आहे. भाजपा आरक्षण विरोधी पक्ष आहे त्यामुळे त्यांना आरक्षण द्यायचेच नाही. केंद्रात ९ वर्षांपासून भाजपाचे सरकार आहे पण त्यांनी निर्णय घेतला नाही. मराठा समाजाला



आरक्षण देण्याची भाजपाची प्रामाणिक इच्छा असेल तर संसदेच्या विशेष अधिवेशनातच मराठा आरक्षणाचा निर्णय घेऊन मराठा समाजाला न्याय द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.







Owner,Printer & Publish Sunita Bhagwan Kesbhat,Parrh Printing Press, Karnala Bhavan, Plot No.456 A/1, Sahakari Bhat Girni Compound Matket yard, Panvel, Dist. Raigad - 410206. Published at plot No.D-37/34, Sector-12, Kharghar, Navi Mumbai-410210, Tal. Panvel,Dist.-Raigad.
Editor : Sunita Bhagwan Kesbhat
RNINo.MAHMAR/2015/64681